## मॉरिशसमध्ये मराठी भाषा जपण्यात मराठी साहित्य परिषदेची भूमिकाः

पृथ्वीवरील स्वर्ग म्हटलं तर आपोआपच मॉरिशसचे नाव पुढे येतो. या निसर्गरम्य देशातही मराठी संस्कृती व भाषा मोठया आदराने शिकवले व शिकले जाते. मॉरिशस या बहुभाषीय देशात मराठी भाषेचा प्रसार करणाऱ्या अनेक संस्था आहेत जो आपल्या पूर्वजांनी भारतातून आणलेली आपली मराठी भाषा जपण्यासाठी कार्यारत आहेत. मराठी साहित्य परिषद ही त्या संस्थापैकी एक महत्तवपूर्ण संस्था आहे.

मराठी साहित्य परिषद ही एक शिक्षण संस्था आहे जे १७ जुलै १९६९ साली जन्मास आली. या संस्थचे संस्थापक प्राध्यापक गजानन पुरूषोत्तम जोशी होते. आमचे पूर्वज भारतातून माती खोदून सोने मिळतील या आमिषामुळे मॉरिशसला आले. त्यांनी आपल्याबरोबर आपली अनमोल मराठी भाषा, संस्कृती व परंपरा आणली.

सुरूवातीला मराठी बोली स्वरूपात बोलली जात होती. प्राध्यापक ग. जोशींना हे माहीत होते. म्हणून त्यांनी तीन ठिकाणी म्हणजे रोजबेल हाय स्कूल, वाक्वा धार्मिक सभा व कॅम्ब्रिध कॉलेज बो बासें मराठी शाळा आरंभिले. तेव्हापासून विद्यार्थ्यांना प्रमाण भाषा शिकवण्याची जबाबदारी घेतली. मुले शुद्ध मराठी व्याकरण लिहू व वाचू लागली. अशा हेतूने मराठी साहित्य परिषद ह्या संस्थेने ज्ञानदानाचे कार्य हाती घेतले.

जेव्हा प्रा. ग. जोशी मराठी शिक्षणतज्ज्ञ म्हणून आले तेव्हा त्यांनी पाहिले की अवांतर वाचनासाठी पुस्तके नाहीत, मराठी भाषा शिकवणारे फक्त ७–१० शिक्षक होते. विद्यार्थी नकळत वाचन–लेखन करत होते. त्यांना लक्ष्यित भाषेत योग्यरित्या व्यक्त करता येत नव्हते. त्यामुळे मराठी भाषा आणि मराठी संस्कृती शिकण्याची ऊर्मी पा. ग. जोशींना स्पर्शून गेली. त्या काळी अनेक विद्यार्थ्यांनी पहिली प्राथमिक परीक्षा

दिली आणि काही सहा महिन्यांत उच्च परीक्षेला बसले. १० हुषार विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना महाराष्ट्रात मुंबईजवळील पनवेल शिक्षक प्रशिक्षण संस्थेत पाठवण्यात आले. त्यांच्यापैकी बरेच जन डिप्लोमा, बी. ए. , एम. ए आणि पी. एच. डीकडे त्यांचा सरकाव आहे व झाला.

बहुसंख्य सरकारी मराठी शिक्षक हे माजी मराठी साहित्य परिषदेचे विद्यार्थी आहेत. त्यांनी गुरूजी दैवुजी पादया यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले आहे ज्यांनी दीर्घकाळ निष्ठेने परिषदेची सेवा केली आहे आणि मॉरिशसमध्ये मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल आदर आहे. मॉरिशस मराठी साहित्य परिषद ही एकमेव स्वयंसेवी मराठी संघटना आहे जी इयत्ता १ ते इयत्ता १३पर्यंत मोफत मराठी शिकवण्या देऊन मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी पूर्णपण समर्पित आहे.

१९६९ मध्ये त्याची निर्मिती झाल्यापासून मराठी साहित्य परिषद मराठी विद्यार्थ्यांना शिक्षण आणि योग्य शिक्षणाच्या क्षेत्रातील मूलभूत ज्ञान, व्यावहारिक कौशल्ये आणि आवश्यक साधने प्रदान करण्यात व सक्षम करण्यात आघाडीवर आहे. गेल्या काही वर्षांपासून , प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावरील अनेक विद्यार्थ्यांना नैतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्ये जोपासण्यात परिषदेने महत्तवाची भूमिका आजतागायत बजावली आहे.

आम्ही सतत म्हणतो की आम्ही मराठी आहोत, आमच्यामध्ये शिवाजी महाराजांचे रक्त आहे आणि आम्हाला याचा अभिमान आहे, परंतु मराठी भाषशिवाय व या भाषतील मौल्यवान वाङ्मयीन ज्ञानाशिवाय आपण पोकळी अनुभवतो. भाषेशिवाय आपले मोल नाही. मराठी साहित्य परिषदेमुळे मराठी भाषेत संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास यांसारखे महान संतांची कामगिरी, ग्रंथ शिकण्यास मिळतात.

मराठी साहित्य परिषदने आपल्या पूर्वजांनी आपल्याबरोबर आणलेली मराठी भाषा व मराठी संस्कृती आपल्या अभ्यासक्रमात संक्रमित केली व रूजवली. परिषदेत विद्यार्थी संतांच्या कामगिरीवर शिकतात व आपल्या दैनंदिन जीवनात ती शिकवण वापरतात. आपल्या पूर्वजांनी दिलेला हा वारसा साहित्य परिषदेमुळे आपण अजून चालवत आहे. हे आपले कर्तव्य आहे व मराठी साहित्य परिषद मराठी समाजांसाठी कार्यारत आहे. मॉरिशस हा बहुभाषिक व बहुसांस्कृतिक देशात मराठी भाषा व मराठी साहित्य सर्वांबरोबर वाटून घेणे हे महत्त्वाचे कार्य मराठी साहित्य परिषद आपुलकीने करत आहे.

दरवर्षी मराठी साहित्य परिषद मुलांना व तरूण पिढींना प्रोत्साहित करण्यासाठी अनेक स्पर्धा आयोजित करतात जसे चित्रकला स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, मनाचे श्लोक पठण स्पर्धा, इत्यादी. फक्त हेच नव्हे तर मॉरिशस मराठी नाटक महोत्सवात सुद्धा ते भाग घेत असतात. गेल्या दशकापासून अनेक मराठी साहित्य परिषदेच्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषेत राष्ट्रीय स्तरावर सवोत्तम कामगिरी करणाऱ्यांमध्ये स्थान मिळवले आहेत, मग ते पेसाक, एस. सी आणि एच. एस. सी परीक्षांमध्य असो. या संस्थेतून शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांनो महाराष्ट्रात पदवीच्या अभ्यासासाठी भारतीय शिष्यवृती पटकरली आहेत आणि काहींनो मॉरिशसच्या विद्यापिठमधून मराठीत पदवी घेतली आहेत आणि आता ते प्राथमिक, माध्यमिक शाळेत व विद्यापिठीय स्तरावरही शिक्षक व प्राध्यापक म्हणून मराठी समाजाची सेवा करत आहेत.

गेल्या तीन चार वर्षांपासून मराठी साहित्य परिषद मराठी भाषेचा प्रचार करण्यासाठी आणि तरूणांना प्रोत्साहन देण्यासाठी सोशल मोडियावर जसे फेसबुक यावर सक्रिय आहेत. २०२१ मध्ये जेव्हा जग कोविड महामारीपासून वाचले नव्हते तेव्हा मराठी साहित्य परिषदेने आजच्या तरूणांना शिक्षित करण्याचे साधन शोधले जेणेकरून त्यांना दंड होऊ नये. त्या भीषण काळात मराठी साहित्य परिषदेने कविता, चित्रकला

स्पर्धेच आयोजन केले होते. आपल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि आपली परंपरा अबाधित ठेवण्यासाठी सोशल मीडियावर– फेसबुकवर गुढी पाडव्याचा उत्सव सर्जनशील पद्धतीने करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन आणि अध्यापन याविषयी अधिक माहिती व्हावी यासाठी नुकतीच किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पालकांना प्रेरित करण्यासाठी तोरण बनवण्याची स्पर्धाही घेण्यात आली.

**माझ्या जीवनात मराठी साहित्य परिषदेचा योगदानः**

माझ्या शिक्षणाच्या यशासाठी ज्याप्रमाणे प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व विद्यापिठीय शिक्षणाला अत्यंत महत्त्व आहे, त्याचप्रमाणे मराठी साहित्य परिषदेलाही माझ्या जीवनात अत्यंत प्रतिष्ठेचे स्थान आहे.

शामुनी मराठी विश्वनाथ मंदिर मराठी साहित्य परिषदेची एक शाखा आहे. माझ्या शामुनी गावातसुद्धा मॉरिशस मराठी साहित्य परिषदेच्या तर्फेने आठवडयातील सोमवारी ते शनिवारी मराठी शिकवणी दिली जाते. पूर्वी फक्त इयत्ता पहिली ते प्रवेशपर्यंत शिकवणी दिली जात होती. माझ्या गावात प्रवृत्त ते प्रभातपर्यंत शिकवण्यासाठी शिक्षक नव्हते. म्हणून मला वाक्वा मराठी साहित्य परिषदेच्या मुख्य शाखामध्ये जो त्याकाळी डॉ. मॉरिस क्युरे शाळेत माध्यमिक शिकवणी घेण्यासाठी जावे लागले. शामुनी ते वाक्वा सुमारे दोन तासांचा प्रवास पण त्याकाळी साहित्यीक ज्ञान

मिळवण्यासाठी मी दर शनिवारी ,न चुकता हा प्रवास स्वीकारला. माझ्या शैक्षणिक जीवनात आज यशस्वी झाल्याचे श्रेय मॉरिशस मराठी साहित्य परिषदेलाच जाते. मी सदैव मनापासून मराठी साहित्य परिषदेचे कृतज्ञ राहीन.

आज मी माध्यमिक शाळेत शिक्षिका म्हणून काम करत आहे. फक्त हेच नव्हे तर शामुनी गावात मी गेल्या वीस वर्षांपासून मराठी साहित्य परिषदेच्या शिक्षिका म्हणून मुलांना इयत्ता पहिली ते प्रभातपर्यंत शिकवत आहे. आता माझ्या गावातील विद्यार्थ्यांना हा थकवा आणि लांब प्रवास अनुभवावा लागत नाही. मी माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांना साहित्यिक ज्ञान देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

मराठी साहित्य परिषद ह्या संस्थेने अनेक तल्ल्ख शिक्षकांना घडवले. मी स्वर्गीय बाई तात्या, बाई इतोबा, बाई महादिया आणि गुरूजी होमराजन गौरियांचे आभार मानू इच्छिते कारण माझ्या ह्या मराठी साहित्य परिषदेच्या शिक्षकांनी मला माझ्या प्रयत्नांमध्ये उत्कृष्ट होण्यासाठी मदत केली. बो. ए मराठी, पो. जी. सी. इ मराठी व आज मी जे आहे ते त्यांची मला शिकवण्याची पद्धत, त्यांनी माझ्यात आत्मसात केलेली शिस्त आणि चांगले संस्कार यामुळेच मी एक चांगले नागरिक व शिक्षिका बनले आहे. गेल्या काही दशकामध्ये माग वळून पाहिल्यास, हे स्पष्ट होते की समाजात महिल्यांचे स्थान अनेक प्रकारे लक्षणोयरीत्या विकसित झाले आहे. त्यांपैकी शिक्षण हे सर्वात विश्वासार्ह मानले जाऊ शकते. सुनियोजित शिक्षण महिलांना समाजाच्या प्रत्येक क्षत्रात भाग घेण्यास सक्षम करते आणि त्यांना समाजातील कोणत्याही प्रकारच्या प्रतिकूल पैलूंविरूद्ध बोलण्याचे धैर्य आणि आत्मविश्वास देते. आणि हे सर्व मराठी साहित्य परिषदेच्या शिकवणुकीमुळेच शक्य झाले आहे.

मराठी साहित्य परिषदेच्या यशात योगदान देणाऱ्या मोजक्या शिक्षकांचे कष्ट मी विसरू शकत नाही, असे मला शेवटी म्हणायचे आहे. गुरूजी देवजी पादया,

गुरूजी रूपसेन देवुजी, गुरूजी होमराजेन गौरिया व बाई निरूपा महादिया हे माझ्या ओळखीच्या शिक्षकांपैकी आहेत. या जगात असे लोक आहेत जे कुठेही जातात ते चांगले बनवतात. आपल्या आदरणीय शिक्षकांना व मराठी साहित्य परिषदला कोटीकोटी धन्यवाद.

जय मराठी साहित्य परिषद ।

जय महाराष्ट्र।

जय मॉरिशस।

सौ. एलविनाबाई जनक